# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०१/१०/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**१) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील कांद्री वार्ड क्र. १ येथे दिनांक २९/०९/२०२२ चे ०६.३० वा. ते १९.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— वासुदेव महादेव आकरे, वय ५५ वर्ष, रा. कांद्री वार्ड क्र. १ हे दररोज प्रमाणे मंदीरात गेले असता मंदीरातील आतील गाभाऱ्यातील हनुमानजीच्या मुर्तीवरील चांदीचे मुकुट २५० ग्रॅम कि. १२,०००/—रु. तसेच पंचधातुचा घंटा ३.५ किलो कि. ७,०००/—रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नरेश वरकडे मो.नं.९६३७००५३०३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील आंबेडकर वार्ड पाणीचे टाकी समोर रामटेक येथे दिनांक २९/०९/२०२२ चे १४.०० वा. ते १४.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— प्रेमलाल परसराम पोटभरे, वय ८० वर्ष रा. भगतसिंग वार्ड रामटेक यांनी शिक्षक सरकारी बॅक गांधी चौक रामटेक येथुन ५०,०००/— रू. रोख रक्कम काढुन ती रक्कम एका लाल रंगाच्या कापडी पिशवीत ठेवुन रक्कम पिशवीत घेवुन पायदळ घराकडे जात होता. त्यादरम्यान एक अज्ञात आरोपी हा दुचाकी वाहनाने येवुन फिर्यादीला म्हणाला की, 'तुम्हाला घरी सोडतो' असे सांगीतल्याने तो त्याचे गाडीवर बसला थोडया अंतरावर गेल्यानंतर त्याने गाडी थांबवुन गाडीवरून फिर्यादीस त्याचे सांगण्यावरून खाली उतरल्याने आरोपीने त्याचे हातातील पिशवी मागीतल्याने फिर्यादीने पिशवी त्यास दिली असता तो वाहन चालक अज्ञात आरोपीने सदर ५०,०००/—रू. रक्कम असलेली पिशवी चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास नाईक योगेश भुरे मो.न. ७७२२००३६७६ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. नरखेड** :— अंतर्गत केवळराम पिपळा येथे दिनांक ३०/०९/२२ ते २१.४५ वा. ते ०१/१०/२२ ते ०७.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— लोकेश वासुदेवराव बारमासे, वय ३४ वर्ष रा. केवळराम पिपळा हे आपले मेडीकल दुकान बंद करून घरी गेले. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने मेडीकल दुकानातुन ३०००/—रू. चे टॅबलेट तसेच गाडीचे कागदपत्र सिसि टीव्ही कॅमेराचे मशीन कि २,५००/—रू. तसेच मडक्यात असलेले ४,०००/—रू. असा एकुण ९,५००/—रू. तसेच त्याचे दुकानापेढे असलेले किराना दुकाना मध्ये असलेले काउटंर मधुन नगदी ४,०००/—रू व जुने चांदीचे १५० शिक्के कि १०,०००/—रू. व जुने सोन्याचे १० ग्राम वजनाचे ४ नग डोळे कि ६,०००/—रू. तसेच पावरबॅक स्मॉर्ट वॉच कि १,०००/—रू. असा एकुण कि. ३०,५००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने रात्री दर चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर